# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषि नगर, अकोला - ४४४१०४

संदर्भ :- विद्यापीठ जाहिरात क्र.पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२, दिनांक २४ मार्च, २०१२

## सुचना

क्र.पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२ दिनांक :- २० मार्च, २०१५

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठंतर्गत दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी सहाय्यक कुलसचिव/सहाय्यक नियंत्रक या पदाची लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे. **दिनांक २५ मार्च, २०१५** रोजी सदर परिक्षेमधील उमेदवारांची गुणवत्ता यादी एम.के.सि.एल., पुणे याचे तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर लेखी परिक्षेच्या प्राप्त गुणांच्या आधारे, जाहिरातीतील पदसंख्येनुसार कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविण्यात येणा-या उमेदवारांच्या नावांची प्रवर्गनिहाय यादी विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत उमेदवारासोबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. संबंधीत उमेदवारांनी वर निर्दीष्ट केलेल्या संकेतस्थळावर पाहुन त्यांचे कागदपत्रांचे पडताळणी करीता खालील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या दिनांकास हजर राहणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | पदाचे नांव | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक कुलसचिव/सहाय्यक नियंत्रक | ३०/०३/२०१५ | १०.०० ते ११.०० | स्व. डॉ. के. आर. ठाकरे सभागृह, कृषि महाविद्यालय, कृषि नगर, अकोला. |

संबंधीत उमेदवारांनी कागदपत्रांचे पडताळणीकरीता येतांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र, ओळखपत्र व एमकेसीएल यांनी पुरविलेल्या पीडीएफ अर्जाची प्रत आणि त्यासोबत जाहिरातीचे अनुषंगाने अर्जासोबत सादर केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व छायांकित प्रतींचा संच सोबत आणावा. उमेदवारांनी कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलविण्यात आलेल्या नियोजित दिवशी वेळेवर उपरिस्थत राहावे. जे उमेदवार नियोजित वेळी व दिनांकास उपस्थित राहणार नाहीत अथवा जे उमेदवार नमुद केलेली कागदपत्रे पुरविण्यास असमर्थ ठरतील अशा उमेदवारांची उमेदवारी ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच नंतर त्याविषयी कुठल्याही प्रकारची तक्रार/विनंती मान्य करण्यात येणार नाही याची संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

केवळ कागदपत्रांच्या पडताळणीकरीता बोलविण्यात आले म्हणुन उमेदवारांनी निवड झाली असे समजण्यात येवु नये. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर जाहिरात केलेल्या प्रवर्गातुन पात्र ठरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड मुलाखतीविना करण्यात येणार आहे.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला